# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.०२/०२/२०१८
## दि.०१/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४९/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हे.ॲक्ट १८४,१३४(अ)(ब) |
| **फिर्यादी** | संतोष बित्रा,वय २३ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०२/१८ रोजी रात्री ०२/४५ वाचे सुमारास पुणे सोलापुर रोड,इंडियन ख्रिश्चन दफन भुमी समोर,पुणे |
| **तपशिल** | अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांची सहकारी नामे- सृष्टी आदित्यकुमार शुक्ला,वय २२ वर्षे,रा.कात्रज,पुणे मुळ गांव-कानपुर उत्तरप्रदेश हिचेसह मोटार सायकवरुन जात असताना, त्यांना अज्ञात वाहनचालकाने जबर ठोस मारून, दोघांना गंभीर जखमी करून, त्यामध्ये सृष्टी शुक्ला हिचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्हि.एन.राऊत ९९७०८४७६२४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ६७/१८,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २७ वर्षे,रा.तळेगांव रेल्वे स्टेशन जवळ,पुणे |
| **आरोपी** | तुळाराम रंगराव जाधव, वय १८ वर्षे,रा.मु.पो. भेंदीदांडा,ता. किनवट, जि.नांदेड (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३१/०१/२०१८ रोजी १९/३० वा.चे सुमारास गोकुळ हॉटेल समोर रोडवर पिंपरी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरुन जात असताना,नमुद इसमाने त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे हातातील एक मोबाईल १८ हजार रू.किमतीचा व आधार कार्ड जबरदस्तीने हिसकावु चोरून घेवुन जात असताना मिळुन आला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निमगीरे ७५८८८८२२४७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३३/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | प्रशांत डाटा,वय ४२ वर्षे,रा.सॅलसबरी पार्क,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०१/२०१८ रोजी रात्रौ २०/३० वा.ते दि.०१/०२/२०१८ रोजी सकाळी ०८/३० वा.चे दरम्यान लक्ष्मीनारायण बेस्ट चिवडा दुकान ३७४ भवानी पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे लक्ष्मीनारायण बेस्ट चिवडा दुकान कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे दुकानाचे मागील बाजुने गेटवरुन आत प्रवेश करुन, बनावट चावीच्या सहाय्याने दुकानाचे व ऑफिसचे कुलुप उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, दुकानातील रोख व तीन मॅनिटर, एक डी.व्हि.आर. असा एकुण ४ लाख १२ हजार रुपये किमतीचा माल घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एस.एस. गायकवाड ९८२३१३८५५१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३१/१८,भादविक ३२४,५०४,५०६,१४२,१४३,१४५,१४९ |
| **फिर्यादी** | अवदेश शुक्ला,वय ३४ वर्षे,रा.मुंढवा,पुणे |
| **आरोपी** | १) अतिश अशोक वाघेला, २) विजय अशोक वाघेला, ३) अशोक वाघेला, ४)करुणा अशोक वाघेला,५) अतिश वाघेलाची पत्नी सर्व रा.हडपसर रेल्वे स्टेशन रोड मुंढवा पुणे, स.नं. ६२/७ अ. पुणे. (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०१/२०१८ रोजी १६/३० वा.चे सुमारास हडपसर रेल्वे स्टेशन जवळ मुंढवा पुणे फिर्यादीचे झेरॉक्सच्या दुकानासमोर, मोकळ्या जागेत, |
| **तपशिल** | यातील फिर्याद व नमुद इसम हे एकमेकांचे ओळखीचे असुन, वर नमुद केले ता.वेळी व ठिकणी, यातील नमुद इसम हे फिर्याचीचे झेरॉक्सचे दुकाना शेजारी राहणेस असुन, त्यांनी संगणमत करुन, फिर्यादीचे झेरॉक्सचे दुकानातील लाईट मीटरची तोडफोड करुन,जागेचा ताबा बळकावण्याच्या इरादयाने फिर्यादी हे त्यांच्या जागेवर मुरुम टाकत असताना, गाडीची चावी काढुन, मज्जाव करुन वर नमुद इसमांनी संगनमताने मारहाण करुन फिर्यादीस जखमी करुन शिवागाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.एल.गिरी ९८२३२९२६३८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे २६/१८,भादविक ४०६,४०८,४६५,४६७,४७१,४२०,५०६(१),३८१,३४,माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६(सी),६६आर/डब्ल्यू,४३ (ए),४३ (आय) |
| **फिर्यादी** | विनोद रामनिवास गोयल,वय ४७ वर्षे,रा.मार्केटयार्ड,पुणे |
| **आरोपी** | राहुल कसबे,रा.स्वामी समर्थ नगर,कात्रज कोंढवा रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि ०१/०४/२०१६ ते दि.२३/१२/२०१७ पर्यंत वेळोवेळी दिल्ली फुडस कार्पोरेशन मार्केटयार्ड, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे दिल्ली फुडस कार्पोरेशन मार्केटयार्ड, पुणे येथे भुसार किराणा मालाचे दुकान असुन, यातील नमुद इसम राहुल कसबे याने वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, बिलींग व स्टॉक चेकिंगचे काम करीत असताना, फिर्यादी यांचे संमतीशिवाय संगणकाचा गोपनीय पासवर्ड हॅक करुन, त्याव्दारे संगणकामध्ये फेरफार करुन, बनावट बिले तयार करुन, एकुण ८१ लाख ७ हजार ४९२/-रुपये किंमतीचा माल चोरुन व अपहार करुन, विक्री करुन, फिर्यादी यांची फसवणुक केली व त्या रक्कमेची मागणी फिर्यादी यांनी केल्यानंतर फिर्यादी यांना विष पिवुन आत्महत्या करणेची व चिठ्ठी लिहुन ठेवुन गुन्हयांत अडकविण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | व.पो.निरी. शिंदे ९८२३२५६०५१ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे ३८/१८,भादविक ४२० व माहिती तंत्रज्ञान अधिनीयम २००८, कलम ६६ (सी)(डी) |
| **फिर्यादी** | अमरेंद्रकुमार सिंग,वय ४५ वर्षे,रा. धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०९/२०१७ रोजी ०४/१३ वा.चे सुमारास बँक ऑफ बडोदाचे ए.टी.एम.ठाणे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांच्या ए.टी.एम.कार्डाची गोपनीय माहीती चोरुन, दुसरे बनावट ए.टी.एम.कार्ड तयार करुन,त्याचा वापर करुन ठाणे येथील बँक ऑफ बडोदाचे ए.टी.एम.मध्ये जावुन फिर्यादी यांचे खात्यातुन एकुण २८ हजार रुपये काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली (सदरचा गुन्हा अर्जावरुन दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) ए.टी. वाघमळे ९५५२५५२९३३ |

## दि.०२/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे ३४/१८,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | सागर वाघमारे,वय २५ वर्षे,रा.क्विन्स गार्डन,सर्व्हंट क्वार्टर्स,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०५ सुमारास डॉ.कोयाजी रोडचे कडेला सदर्न कमांड ऑफिसर्स मेसचे मेन गेट जवळील फुटपाथवर |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, मा.श्री.साहेबराव पाटील सो।, यांचे सरकारी निवासस्थान क्लब ऑफ इस्टर्न इंडिया डॉ.कोयाजी रोड कॅम्प,पुणे याठिकाणी रात्रपाळी डयुटीवर हजर असताना, डॉ.कोयाजी रोडचे कडेला फुटपाथवर टेन्ट लावलेला एक अनोळखी बेवारस इसमास एका अनोळखी इसमाने अज्ञात कारणवरुन सिमेंटचे ब्लॉकने जबर मारहाण करुन, त्यास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने जबर जखमी करुन जिवे ठार मारुन, त्याचा साथीदार बरोबर काळया रंगाचे स्कुटरवर पाठीमागे बसुन निघुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी. (गुन्हे) एस.के.यादव ८१०८२५११०० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ६९/१८,भादविक ३९३ |
| **फिर्यादी** | समिल शेख,वय २५ रा.पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | एक विद्यीसंघर्षीत बालक,वय १७ रा.निगडी,पुणे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०२/१८ रोजी रात्रौ ००/३० वा.चे सुमारा महिंद्र ॲन्थीया सोसायटी समोर रोडवर गांधीनगर पिंपरी,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील नमुद विद्यीसंघर्षीत बालकाने फिर्यादी यांना बाजुला घेवुन, पिस्टल सारख्या हत्याराचा धाक दाखवुन, फिर्यादी यांचे जवळील मोबाईल घेण्याचा प्रयत्न केला आहे |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घुगे ९४०३०३१८८९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**